# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-३१०८/२०२१

**अपिलार्थी, श्री.निळकंठ गोकूळ पाटील**
**सी/२०९, न्यू ज्योती अपार्टमेंट**
**पाटील हॉस्पिटल शेजारी, एस.टी.डेपो रोड**
**नालासोपार (प), ता.वसई, जि.पालघर ४०१ २०३**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (कार्यासन २)
राज्य माहिती आयोग कोंकण खंडपीठ, कोंकण भवन
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उप सचिव
राज्य माहिती आयोग कोंकण खंडपीठ, कोंकण भवन
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २९.८.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १७.८.२०२१ | ---- | २३.९.२०२१ | ८.१०.२०२१ |

अपिलार्थी यांनी दि.१.१२.२०२१ रोजीच्या अर्जान्वये "दि.८.१०.२०२१ रोजी ऑनलाईन सुनावणीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी यांनी अपिलार्थीस आपले म्हणणे मांडू दिले नाही. अर्जदाराच्या अपिलावर माहिती अपूर्ण असूनही देण्यात आली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २९.८.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तथापि, विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. अचला झुं. खांडेकर, कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ तसेच तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्रीम. रीना फणसेकर, उप सचिव, राज्य माहिती आयोग कोंकण खंडपीठ या उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

" *(तक्रार क्र.१९२/२०१९ वरील आदेशावर झालेल्या कार्यवाही.)*

*"(१) अर्जदाराच्या च्या आदेशानुसार आजमितीस माहिती तक्रारदारास पुरविण्यात न आल्याने संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी यांचेविरूध्द आपल्या आदेशाचे अनुपालन न केल्याप्रकरणी केलेली अथवा कधी होईल याबाबतची माहिती.*

*(२) संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या आदेशानुसार त्यांना लेखी खुलासा सादर केला असल्यास त्याची प्रत आणि केला नसल्यास त्याच्याविरुध्द करण्यात आलेल्या कारवाईची माहिती.*

*(३) द्वितीय अपिल क्र. १८३६/२०१९ वरील आदेशाची प्रत."*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये " जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे द्वितीय अपिलावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

अपिलार्थींनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.८.१०.२०२१ रोजी सुनावणी घेऊन, "(१) जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. (२) अपिल निकाली काढण्यात येत आहे." असा निर्णय दिलेला आहे.

या प्रकरणी उपस्थित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांना दि. २६.८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये माहिती देण्यात आली आहे. त्याद्वारे अपिलार्थीस असे कळविण्यात आले आहे की, "*द्वितीय अपिल क्र. ३९६२/२०१६ मधील तक्रार क्र.१९२/२०१९ मध्ये झालेल्या आदेशाच्या अनुषंगाने संबंधित जन माहिती अधिकारी*

*यांचेकडून अद्याप या कार्यालयास खुलासा प्राप्त झाल्याचे कार्यालयीन अभिलेखावरून दिसून येत नाही. तसेच यासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांना आयोग कार्यालयाकडून पाठविण्यात आलेल्या दि.१.२.२०२१ च्या पत्राची साक्षांकित प्रत आपणास यासोबत जोडून विनाशुल्क पाठविण्यात येत आहे.*" तसेच द्वितीय अपिल क्र. के. आर. १८३६/२०१९ या प्रकरणात आयोगाने पारित केलेल्या आदेशाची प्रतसुध्दा अपिलार्थींना विनाशुल्क पाठविण्यात आली आहे.

अपिलार्थींनी मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, आयोगाने द्वितीय अपिल क्रमांक के.आर.३९६२/२०१६ मधील तक्रार क्र. १९२/२०१९ या प्रकरणात दि.२८.१.२०२० रोजी दिलेल्या आदेशानंतर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी पालन ने केल्याने त्यांचेविरुध्द केलेल्या कार्यवाहीची माहिती अपिलार्थींनी अपेक्षिलेली आहे.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी यावर असे निवेदन केले की, आयोगाच्या कार्यालयातून देण्यात आलेल्या दि.१.२.२०२१ रोजीच्या पत्राशिवाय या प्रकरणी आयोगाने इतर कोणताही कार्यवाही केलेली नाही. म्हणजेच आयोगाकडून जी कार्यवाही करण्यात आली आहे त्यासंबंधीची संपूर्ण माहिती अपिलार्थींना देण्यात आली आहे. संबंधित द्वितीय अपिल क्र. के.आर. ३९६२/२०१६ मधील तक्रार क्र.१९२/२०१९ यामध्ये अपिलार्थी हे तक्रारदार होते व त्यांच्या सदर प्रकरणातच आयोगाकडून ही कार्यवाही झाली आहे. त्या नस्तीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, आयोगाने संबंधित जन माहिती अधिकारी यांचा लेखी खुलासा ३० दिवसांत अपेक्षिला होता. तो अद्याप आयोगास प्राप्त झालेला नाही ही वस्तुस्थिती आहे आणि म्हणून जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती जरी अपिलार्थीच्या अपेक्षेप्रमाणे नसली तरी ती परिपूर्ण असल्याचे दिसून येते.

दुसरा जो मुद्दा या ठिकाणी महत्वाचा आहे तो असा की, आयोगाने दिलेल्या आदेशानंतर त्यामध्ये संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही न करणे अथवा त्यांच्याकडून लेखी खुलासा अपेक्षिला असता तो विहित कालावधीत सादर न करणे. सबब, ही गंभीर बाब आहे. त्याचप्रमाणे आयोगाच्या कार्यासनाने याबाबत योग्य तो पाठपुरावा करणेही महत्वाचे आहे. अपिलार्थींनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली असली तरीसुध्दा, **द्वितीय अपिल क्र. के.आर. ३९६२/२०१६ मधील तक्रार क्र.१९२/२०१९ व हे प्रकरण एकत्रितरित्या घेऊन पुढील सुनावणीस ठेवणे उचित होईल व ही वस्तुस्थिती अपिलार्थीसही कळविणे उचित होईल. प्रस्तुत दोन्ही प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल**. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत दोन्ही प्रकरणी पुढील सुनावणी दि. १७.१०.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २९ ऑगस्ट, २०२४

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
**(आयोगाच्या द्वितीय अपिल क्र. के. आर. ३९६२/२०१६ मधील तक्रार क्र. १९२/२०१९, दि.२८.१.२०२० रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने)**

**(१)** विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. संजय पाटील, वरीष्ठ लिपिक, (अनधिकृत बांधकाम विभाग),
प्रभाग समिती (ई) नालासोपारा, नालासोपारा विभागीय कार्यालय,
**आणि (२)**तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. जगदिश सुतार, वरिष्ठ लिपिक, (अनधिकृत बांधकाम विभाग),
प्रभाग समिती (ई) नालासोपारा, नालासोपारा विभागीय कार्यालय,
वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्य कार्यालय विरार,
यशवंत नगर, विरार (प), ता. वसई, जि. पालघर ४०१ ३०३.

**-यांना प्रत** विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वरीष्ठ लिपिक, (अनधिकृत बांधकाम विभाग),
प्रभाग समिती (ई) नालासोपारा, नालासोपारा विभागीय कार्यालय,
वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्य कार्यालय विरार,
यशवंत नगर, विरार (प), ता. वसई, जि. पालघर ४०१ ३०३ **यांचेमार्फत रवाना.**

**अपिल क्रमांक : के.आर-३१०८/२०२१**

**अपिलार्थी, श्री.निळकंठ गोकूळ पाटील**

**सुनावणी दिनांक १७.१०.२०२४ (In continuation of order dt.२९.८.२०२४)**

**<u>विवेचन</u>**

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. अचला झुं.खांडेकर, कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ आणि तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्रीम. रीना वि. फणसेकर, उप सचिव, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ, नवी मुंबई या उपस्थित आहेत.

या प्रकरणी द्वितीय अपिल क्रमांक के.आर.३९६२/२०१६ मधील तक्रार क्र.१९२/२०१९ दि.२८.१.२०२० या प्रकरणाचीसुध्दा सुनावणी आजरोजी लावण्याबाबत आदेशित केले होते. तथापि, त्या प्रकरणातील संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी यांना आजच्या सुनावणीची नोटीस काढण्यात आल्याचे दिसून येत नाही. सबब, या प्रकरणातील जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी यांना सुनावणीची नोटीस काढणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्चः सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१०.१२.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १७ ऑक्टोबर, २०२४

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
विद्यमान प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा प्र. सहा. आयुक्त,
"इ"प्रभाग समिती, नालासोपारा, नालासोपारा विभागीय कार्यालय,
वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्य कार्यालय विरार,
यशवंत नगर, विरार (प), ता. वसई, जि. पालघर ४०१ ३०३.

**(आयोगाच्या द्वितीय अपिल क्र. के. आर. ३९६२/२०१६ मधील तक्रार क्र. १९२/२०१९, दि.२८.१.२०२० रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने)**

**(१)** विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. संजय पाटील, वरीष्ठ लिपिक, (अनधिकृत बांधकाम विभाग),
प्रभाग समिती (ई) नालासोपारा, नालासोपारा विभागीय कार्यालय,

**आणि (२)**तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. जगदिश सुतार, वरिष्ठ लिपिक, (अनधिकृत बांधकाम विभाग),
प्रभाग समिती (ई) नालासोपारा, नालासोपारा विभागीय कार्यालय,
वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्य कार्यालय विरार,
यशवंत नगर, विरार (प), ता. वसई, जि. पालघर ४०१ ३०३.

**<u>-यांना प्रत</u>** विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वरीष्ठ लिपिक, (अनधिकृत बांधकाम विभाग),
प्रभाग समिती (ई) नालासोपारा, नालासोपारा विभागीय कार्यालय,
वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्य कार्यालय विरार,
यशवंत नगर, विरार (प), ता. वसई, जि. पालघर ४०१ ३०३ **<u>यांचेमार्फत रवाना.</u>**